लोकमत

# २५ जानेवारीपासून पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षा

## ऑनलाईन स्वरूप : वेळापत्रक जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेच्या पदवी प्रथम वर्षाच्या हिवाळी सत्रातील परीक्षांचा प्रारंभ दि. २५ जानेवारीपासून होणार आहे. या परीक्षा ऑनलाईन स्वरूपात महाविद्यालय पातळीवर होतील. त्याबाबतच्या सूचना शिवाजी विद्यापीठाने कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील संलग्नित २७६ महाविद्यालयांना शुक्रवारी दिल्या. हिवाळी सत्रात होणाऱ्या एकूण ६६४ परीक्षांचे वेळापत्रक विद्यापीठाने जाहीर केले.

कोरोना, ओमायक्रॉनच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने हिवाळी सत्रातील सर्व परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला आहे. पारंपरिक अभ्यासक्रमाच्या पदवी प्रथम वर्षाच्या (प्रथम, द्वितीय सत्र) सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाविद्यालय पातळीवर, तर डिप्लोमा, पी. जी. डिप्लोमा, सर्टिफिकेट कोर्सच्या परीक्षा महाविद्यालय आणि विद्यापीठ अधिविभाग पातळीवर दि. २५ जानेवारी ते दि. १५ फेब्रुवारीदरम्यान होतील. औषधनिर्माणशास्त्र, विधि, शिक्षणशास्त्र, वास्तुनिर्माण, अभियांत्रिकी या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या (प्रथम, द्वितीय वर्ष नवीन प्रवेश वगळून) परीक्षा क्लस्टर पातळीवर दि. २५ जानेवारी ते २५ फेब्रुवारी या कालावधीत होतील. त्याची जबाबदारी अभ्यासक्रमनिहाय नेमलेल्या समन्वयक महाविद्यालयांवर आहे. या परीक्षांबाबतच्या सूचना संलग्नित महाविद्यालय, अधिविभागांना दिल्या असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक निवास माने यांनी शुक्रवारी दिली.

### परीक्षेचे स्वरूप असे

सकाळी साडेदहा ते साडेअकरा, दुपारी साडेबारा ते दीड, दुपारी अडीच ते साडेतीन, दुपारी साडेचार ते सायंकाळी साडेपाच अशा चार सत्रांमध्ये ऑनलाईन स्वरूपात परीक्षा होईल. त्यासाठी ५० गुणांची संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित २५ प्रश्न प्रत्येकी दोन गुण असतील. बहुपर्यायी प्रश्नांचा समावेश असलेला पेपर सोडविण्यासाठी एक तासाची वेळ असणार आहे.

### आकडेवारी दृष्टिक्षेपात



| | |
|---|---|
| **६६४** हिवाळी सत्रात होणाऱ्या परीक्षा | **२७६** संलग्नित महाविद्यालय |
| **३४** विद्यापीठातील अधिविभाग | **२,२०,०००** एकूण परीक्षार्थी |

**15 JAN 2022** लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

आर्किटेक्चरच्या सबा लाड हिला सुवर्णपदक

# ‘डीवायपी’चे ३३ विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कसबा बावडा :** कसबा बावडा येथील डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ३३ विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठामार्फत जाहीर केलेल्या अंतिम वर्ष अभियांत्रिकी परीक्षेच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळविले आहे. यामध्ये डीवायपीच्या साक्षी घाटगे (इलेक्ट्रॉनिक्स), शुभम् पाटील (प्रोडक्शन), अक्षय पुनाळकर (केमिकल), सबा लाड (आर्किटेक्चर) यांनी विद्यापीठ गुणवत्ता यादीत अव्वल स्थान पटकावले आहे. आर्किटेक्चर विभागात सर्वाधिक गुणांसह सबा लाड हिने सुवर्णपदक मिळविले आहे.

शिवाजी विद्यापीठामार्फत २०२०-२०२१ च्या अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्यात आल्या होत्या. या परीक्षेची गुणवत्ता यादी जाहीर केली. प्रॉडक्शन विभागात शुभम् पाटील याने प्रथम क्रमांक पटकावला. शशांक खटाव व पुरुषार्थ नलवडे (द्वितीय), अनुप पाटील व ऋषिकेश शेवाळे (तृतीय), दिग्विजय घाटगे (चौथा), रोहित अजमाने (पाचवा), शिवराज पाटील व नितेश शेवाळे (सहावा), प्रशांत पाटील (सातवा), अजित चौगुले व प्रणित पाटील (आठवा) क्रमांक मिळविला आहे. केमिकल विभागात अक्षय पुनाळकर याने प्रथम स्थान पटकावले असून, अंकिता कोळेकर ही दुसऱ्या स्थानी आहे. रोहिणी पाटील (सहावी), जितेंद्र कुमार चौधरी (आठवा), कुणाल जाधव (नववा) क्रमांक मिळविला. इलेक्ट्रॉनिक्स विभागात साक्षी घाटगे हिने गुणवत्ता यादीत प्रथम स्थान मिळविले असून, यश कवठेकरने तृतीय, तर सूरज लांडगे याने सातवे स्थान मिळविले. मेकॅनिकल विभागाच्या स्वरूप पावशे याने नववे, तर अजिंक्य पाटील याने दहावे स्थान मिळविले आहे. कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागाच्या प्राजक्ता जाधव यानेही दहावा क्रमांक मिळविला आहे.


अक्षय पुनाळकर


साक्षी घाटगे


सबा लाड


शुभम पाटील

**टॉप टेनमध्ये** डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आर्किटेक्चर विभागाची विद्यार्थिनी सबा रियाझ लाड हिने सुवर्णपदक मिळविले आहे. सबाने १३०० पैकी १२१७ गुण मिळवीत ही देदीप्यमान कामगिरी केली. याच महाविद्यालयाच्या पृथ्वीराज मोरे (द्वितीय), रीतल पंडित (तृतीय), देविका घाटगे (चौथा), रोहन कस्तुरे (सहावा), लांचेबा लिंगथोजम, लकीस्टार पैंग्रोपे व महिमा शर्मा (आठवा), स्नेहा पाटील (नववा) व मधुमिता सावंत (दहावा), अशा १० विद्यार्थ्यांनी 'टॉप १०'मध्ये स्थान मिळविले आहे. कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता यांनी या विद्यार्थ्यांचे यश महाविद्यालयासाठी अतिशय अभिमानास्पद असल्याचे सांगितले.

15 JAN 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ हिवाळी सत्र ऑनलाईन परीक्षा १५ फेब्रुवारीपासून

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील ऑक्टोबर, नोव्हेंबर २०२१ च्या हिवाळी परीक्षांच्या तारखांचे परिपत्रक शिवाजी विद्यापीठाने जाहीर केले आहे. त्यानुसार १५ फेब्रवारीपासून विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू होणार आहेत.

विद्यापीठ स्तरावरील सर्व अभ्यासक्रमाच्या सर्व सत्रांच्या परीक्षा विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार कोरोना . प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहेत. ५० गुणांची सर्व अभ्यासक्रमावर आधारित परीक्षा 'एमसीक्यू' पद्धतीने होईल. सकाळी



१०.३० ते ५.३० या वेळेत चार सत्रात या ऑनलाईन परीक्षा घेण्यात येतील.

बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बीसीए, बीबीए, बीएसडब्ल्यू, बॅचलर ऑफ इंटेरियर डिझाईन, बॅचलर ऑफ फूड टेक्नॉलॉजी, बॅचलर ऑफ मल्टिमीडिया, बी. व्होक, एम.ए (विविध भाषा, विषय), बी.जे., एम.जे., बी.लिब., एम.लिब., एम.कॉम., एम.एस्सी., मास्टर ऑफ व्हॅल्युएशन, एमसीए, बीएस्सी.(नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी), वाय. सी.एस.आर.डी., बी.टेक., एम.टेक., अभ्यासक्रमाच्या विविध सत्रांचा यामध्ये समावेश आहे. मार्च अखेरपर्यंत या परीक्षा चालतील. परीक्षांचे निकाल विद्यापीठ कायद्यानुसार वेळेत जाहीर केले जातील, असे परीक्षा विभागाने परिपत्रकात म्हटले आहे.

## प्रथम वर्षाच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर

पदवी स्तरावरील पारंपरिक अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष (प्रथम, द्वितीय सत्र) विद्यार्थ्यांच्या परीक्षा २५ जानेवारीपासून महाविद्यालय, मान्यताप्राप्त शिक्षण संस्था स्तरावर ऑनलाईन पद्धतीने होतील. त्या-त्या विषयांच्या प्रश्नपत्रिका महाविद्यालयातील शिक्षकांकडून तयार करून घ्याव्यात. परीक्षेचे वेळापत्रक तयार करणे, नियोजनाची जबाबदारी महाविद्यालयांवर राहील. परीक्षा झाल्यावर विद्यार्थ्यांचे गुण संगणक प्रणालीत भरण्याच्या सूचना विद्यापीठाने दिल्या आहेत.

पुढारी

# २५ पासून क्लस्टर पद्धतीने होणार व्यावसायिक अभ्यासक्रम परीक्षा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील ऑक्टोबर, नोव्हेंबर हिवाळी सत्रातील व्यावसायिक पदवी, पदव्युतर अभ्यासक्रमाच्या सर्व सत्रांच्या परीक्षा विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन क्लस्टर पद्धतीने २५ जानेवारी ते २५ फेब्रुवारी या कालावधीत घेण्यात येणार आहेत.

परीक्षा विभागाने याबाबतचे परिपत्रक शुक्रवारी काढले आहे. त्यानुसारव्यावसायिकअभ्यासक्रमाच्या (औषधनिर्माणशास्त्र, विधि, शिक्षणशास्त्र, वास्तुनिर्माण, अभियांत्रिकी) परीक्षा अभ्यास मंडळाच्या निर्णयानुसार प्रचलित ऑनलाईन स्वरूपात ५० गुणांची व सर्व अभ्यासक्रमावर आधारित १ तास कालावधीची बहुपर्यायी प्रश्नावली पद्धतीने घेतली जाणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक निवास माने यांनी परिपत्रकाद्वारे दिली आहे.

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठासमोर सायकल ट्रॅक उभारणीचे काम सुरू झाले आहे. त्यासाठी मार्किंग करताना कर्मचारी. (छाया : नाज ट्रेनर)

# शिवाजी विद्यापीठासमोर होणार 'सायकल ट्रॅक'

## महिन्याभरात काम होणार पूर्ण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठासमोर उभारण्यात येणाऱ्या 'सायकल ट्रॅक'चे काम सुरू करण्यात आले आहे. फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत हा ट्रॅक साकारला जाणार आहे. कोल्हापुरात प्रथमच अशा प्रकारे सायकल ट्रॅक होत आहे.

केसीबीपी उद्यान (हायवे कँटीन चौक) ते बीओटी (डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी) या मार्गावर १९०० मीटर लांब आणि एक मीटर रूंद असा हा ट्रॅक उभारला जाणार आहे. प्रत्येक शहरात सायकल ट्रॅक उभा करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानुसार जिल्हा नियोजन समितीतून हा ट्रॅक तयार केला जात आहे.

या ट्रॅकचे काम सुरू करण्यात आले आहे. या कामासाठी रस्त्यावर कोणत्याही प्रकारचे खोदकाम करावे लागणार नसल्याचे महापालिकेच्या वतीने स्पष्ट केले आहे. ट्रॅकसाठी नट-बोल्टने फिक्स स्टोन, थर्मा पेंटस् फलक आदी साहित्य तयार आहे. ते बसविण्याचे काम सुरू केले आहे.

शहरात प्रायोगिक तत्त्वावर हा सायकल ट्रॅक कार्यान्वित राहणार आहे. भविष्यात केसीबीपी उद्यान ते सायबर चौक, सायबर चौक ते आर. के. नगर नाका, आर.के. नगर नाका ते बीओटी असा शिवाजी विद्यापीठाच्या भोवती ट्रॅक करण्याचा महापालिकेचा विचार आहे.

15 JAN 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ. कोल्हापूर

# विद्यापीठाच्या 'मेरिट'मध्ये 'डी. वाय.'चे ३३ विद्यार्थी

## 'आर्किटेक्चर'च्या सबा लाड हिला सुवर्णपदक, तर चार विद्यार्थी प्रथम


सबा लाड


साक्षी घाटगे


अक्षय पुनाळकर


शुभम पाटील

कोल्हापूर : प्रतिनिधी

कसबा बावडा येथील डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाने या वर्षीच्या निकालामध्येही आपले अव्वल स्थान अबाधित ठेवले आहे. अभियांत्रिकीच्या अंतिम वर्ष परीक्षेची गुणवत्ता यादी शिवाजी विद्यापीठामार्फत जाहीर करण्यात आली असून, यामध्ये महाविद्यालयाच्या तब्बल ३३ विद्यार्थ्यांनी टॉप टेनमध्ये स्थान मिळवले आहे.

साक्षी घाटगे (इलेक्ट्रॉनिक्स), शुभम पाटील (प्रोडक्शन), अक्षय पुनाळकर (केमिकल), सबा लाड (आर्किटेक्चर) या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ गुणवत्ता यादीत अव्वल स्थान पटकावले आहे. आर्किटेक्चर विभागात सर्वाधिक गुणांसह सबा लाड हिने सुवर्णपदक मिळवले आहे.

विद्यापीठामार्फत परीक्षेची गुणवत्ता यादी विद्यापीठाने नुकतीच जाहीर केली असून, प्रोडक्शन विभागच्या १२ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवले असून, यात शुभम पाटील याने प्रथम क्रमांक पटकावला. शशांक खटाव व पुरुषार्थ नलवडे (द्वितीय), अनुप पाटील व ऋषीकेश शेवाळे (तृतीय), दिग्विजय घाटगे (चौथा), रोहित अजमाने (पाचवा), शिवराज पाटील व नीतेश शेवाळे (सहावा), प्रशांत पाटील (सातवा), अजित चौगुले व प्रणीत पाटील (आठवा) असे यश मिळवले आहे.

केमिकल विभागात अक्षय पुनाळकर याने प्रथम स्थान पटकावले असून, अंकिता कोळेकर दुसऱ्या स्थानी आहे. रोहिणी पाटील सहावी, जितेंद्र कुमार चौधरी आठवा, तर कुणाल जाधवने नववा क्रमांक मिळवला. इलेक्ट्रॉनिक्स विभागात साक्षी घाटगे हिने गुणवत्ता यादीत प्रथम स्थान मिळवले असून, यश कवठेकरने तृतीय, तर सूरज लांडगे याने सातवे स्थान मिळवले. मेकॅनिकल विभागाच्या स्वरूप पावशे याने नववे, तर अजिंक्य पाटील याने दहावे स्थान मिळवले आहे. त्याचबरोबर कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागाच्या प्राजक्ता जाधवनेही दहावा क्रमांक मिळवला आहे.

डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आर्किटेक्चर विभागाची विद्यार्थिनी सबा रियाझ लाड हिने विद्यापीठात सर्वोच्च गुण मिळवत सुवर्णपदक मिळवले आहे. सबाने १३०० पैकी १२१७ गुण मिळवत ही देदीप्यमान कामगिरी केली. याच महाविद्यालयाच्या पृथ्वीराज मोरे (द्वितीय), रितल पंडित (तृतीय), देविका घाटगे (चौथी), रोहन कस्तुरे (सहावा), लांचेबा लिंगथोजम, लकीस्टार पैग्रोपे व महिमा शर्मा (आठवा), स्नेहा पाटील (नववा) व मधुमिता सावंत (दहावा) अशा १० विद्यार्थ्यांनी टॉप १० मध्ये स्थान मिळवले आहे.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष गृह राज्यमंत्री सतेज डी. पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, कार्यकारी संचालक ए. के. गुप्ता, प्राचार्य संतोष चेडे आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

15 JAN 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हिवाळी सत्रातील परीक्षाही ऑनलाईनच

## २५ जानेवारीपासून पेपर, ५० गुणांची प्रश्नपत्रिका, महाविद्यालयांना पाठवले परिपत्रक

प्रतिनिधी
कोल्हापूर

महाविद्यालय व मान्यताप्राप्त शिक्षण संस्थांनी कला, वाणिज्य व विज्ञान या शाखांच्या प्रथम वर्षातील प्रथम व द्वितीय सत्रातील (ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२१) सर्व परीक्षा २५ जानेवारी ते १५ फेब्रुवारीमध्ये आयोजित कराव्यात. सर्व परीक्षा ऑनलाईन घेतल्या जाव्यात, असे परिपत्रक परिक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक निवास माने यांनी शिवाजी विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालये व मान्यता प्राप्त शिक्षण संस्थांना पाठवले आहे.

माने यांनी परिपत्रकात नमूद केले आहे की, विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार महाविद्यालय व मान्यता प्राप्त शिक्षण संस्थांनी सर्व शाखांच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारीत बहुपर्यायी स्वरुपाची ५० गुणांची प्रश्नपत्रिका तयार करावी. तसेच प्रश्नपत्रिकेत २५ प्रश्नांची मांडणी करुन प्रत्येक प्रश्नाला २ गुण द्यावेत. परीक्षेला १ तासांचाच अवधी द्यावा. जे विद्यार्थी ज्या विषयांची परिक्षा देतील, त्याच विषयाच्या प्रश्नपत्रिका शिक्षकांकडून तयार घ्यावात. तसेच संबंधित शिक्षकांना प्रश्नपत्रिका तयार करण्याचे पत्रही महाविद्यालय व मान्यता प्राप्त शिक्षण संस्थांनी द्यावे. तसेच सर्व परीक्षांचे वेळापत्रक तयार करताना विद्यापीठाकडून पदवी भाग २ व ३ या परिक्षांचे अवलोकन करावे. अभ्यासक्रमांच्या प्रात्याक्षिक, प्रबंध, प्रकल्प व तोंडी परीक्षाही अभ्यास मंडळांच्या सूचनेनुसारच पण ऑनलाईन घेतल्या जाव्यात. परिक्षांसदर्भात काही अडचणी आल्यास महाविद्यालये व मान्यता प्राप्त शिक्षण संस्थांनी संबंधित विषयांचे बीओएस चेअरमन व अधिष्ठांताशी संपर्क साधावा. परीक्षा घेतेवेळी येणारा सर्व खर्च हा महाविद्यालयाकडील ७५ टक्के परीक्षा शुल्कामधून भागवावा, असेही माने यांनी निवेदनात नमुद केले आहे.

### औषधनिर्माणशास्त्र, विधीचीही परीक्षा २५ पासून

औषधनिर्माणशास्त्र, विधी, शिक्षणशास्त्र, वास्तुनिर्माणशास्त्र व अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या हिवाळी सत्रांमधील परिक्षा २५ जानेवारी ते २५ फेब्रुवारी याच कालावधीत ऑनलाईन पद्धतीने होतील. औषधनिर्माणशास्त्रची परिक्षा ही भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फॉर्मसी, विधी अभ्यासक्रमाची परिक्षा ही भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेज, शिक्षणशास्त्राची परिक्षा ही विटा (जि. सांगली) येथील मार्डन एज्युकेशन सोसायटीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि वास्तुनिर्माणशास्त्राची परिक्षा ही डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरकडून आयोजित केली जाईल. तसेच अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची परिक्षा ही विद्यापीठाने सुचवलेल्या विविध महाविद्यालयांकडून आयोजित केल्या जातील. परिक्षांच्या अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळांशी संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठाच्या परिक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक निवास माने यांनी केले आहे.



जनसंपर्क कक्ष
15 JAN 2022 तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डिप्लोमा, पीजी डिप्लोमा, सर्टिफिकेटच्या हिवाळी सत्रातील परिक्षा ऑनलाईन

## २५ जानेवारी ते २८ फेब्रुवारी दरम्यान होणार पेपर

प्रतिनिधी
कोल्हापूर

डिप्लोमा, पीजी डिप्लोमा, सर्टिफिकेट कोर्स अभ्यासक्रमांच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२१ या सत्रातील सर्व परिक्षा २५ जानेवारी ते २८ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित करण्यात याव्यात. तसेच कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्व परिक्षा ह्या महाविद्यालय व अधिविभागस्तरावर ऑनलाईन पद्धतीनेच घेतल्या जाव्यात, असे परिपत्रक शिवाजी विद्यापीठाच्या परिक्षा व मुल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक निवास माने यांनी विद्यापीठअंतर्गत येणाऱ्या कोल्हापूर, सांगली, साताऱ्यातील महाविद्यालये व अधिविभागांना दिलेले आहे.

या संदर्भात माने यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सर्व महाविद्यालय व अधिविभागांनी डिप्लोमा, पीजी डिप्लोमा, सर्टिफिकेट कोर्स अभ्यासक्रमांच्या परिक्षांचे सर्व पेपर हे ५० गुणांचे तयार करावेत. ऑनलाईन दिल्या जाणाऱ्या प्रश्नपत्रिकेत एकुण २५ प्रश्नांचा समावेश करावा. या प्रश्नाखाली काही पर्यायही द्यावेत. प्रत्येक प्रश्नाला दोन गुण द्यावेत. प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी विद्यार्थ्यांना १ तासांचा अवधी दिला जावा. ऑनलाईन परिक्षा देतेवेळी अचानक तांत्रिक अडचण उद्भवल्यास संबंधीत विद्यार्थ्यांनी तत्काळ महाविद्यालय व अधिविभागाशी संपर्क साधावा. तसेच जे विद्यार्थी तांत्रिक अडचणी मांडतील त्यांची पुनर्परिक्षाही महाविद्यालय व अधिविभागांनी घेण्याची व्यवस्था करावी. शिवाय परिक्षा व गुणांबाबत विद्यापीठाकडे कोणतीही तक्रार येणार नाही, याचीही दक्षता महाविद्यालय व अधिविभागांनी गंभीरपणे घ्यावी. विद्यार्थ्यांनी परिक्षांबाबतची माहिती जाणून घेण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळांशी संपर्क साधावा, असेही माने यांनी निवेदनात नमुद केले आहे.

- **प्रत्येक प्रश्न पत्रिका ५० गुणांची असेल**
- **शिवाजी विद्यापीठ परिक्षा व मूल्यमापन मंडळाने महाविद्यालयांना पाठवले परिपत्रक**

15 JAN 2022 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डी. वाय. पाटील अभियांत्रिकीचे ३३ विद्यार्थी विद्यापीठाच्या 'मेरीट'मध्ये

वार्ताहर
कसबा बावडा

कसबा बावडा येथील डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाने या वर्षीच्या निकालामध्येही अव्वल स्थान अबाधित ठेवले आहे. अभियांत्रिकी परीक्षेच्या अंतिम वर्ष परीक्षेची गुणवत्ता यादीत महाविद्यालयाच्या तब्बल ३३ विद्यार्थ्यांनी टॉप टेनमध्ये स्थान मिळवले आहे. साक्षी घाटगे (इलेक्ट्रॉनिक्स), शुभम पाटील (प्रोडक्शन), अक्षय पुनाळकर (केमिकल), सबा लाड (आर्किटेक्चर) या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ गुणवत्ता यादीत अव्वल स्थान पटकावले. आर्किटेक्चर विभागात सर्वाधिक गुणांसह सबा लाड हिने सुवर्णपदक मिळवले.

शिवाजी विद्यापीठामार्फत २०२०-२१ च्या अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्यात आल्या होत्या. या परीक्षेची गुणवत्ता यादी विद्यापीठाने नुकतीच जाहीर केली. यात डी. वाय. पाटील अभियांत्रिकीच्या प्रोडक्शन विभागच्या १२ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवले.



सबा लाड



साक्षी घाटगे



अक्षय पुनाळकर

यात शुभम पाटील याने प्रथम क्रमांक पटकावला. शशांक खटाव व पुरुषार्थ नलवडे (द्वितीय), अनुप पाटील व ऋषिकेश शेवाळे (तृतीय), दिग्विजय घाटगे (चौथे), रोहित अजमाने (पाचवा), शिवराज पाटील व नीतेश शेवाळे (सहावा), प्रशांत पाटील (सातवा), अजित चौगुले व प्रणीत पाटील (आठवा) क्रमांक मिळवला आहे.

केमिकल विभागात अक्षय पुनाळकरने प्रथम, अंकिता कोळेकरने दुसरे स्थान मिळवले. रोहिणी पाटील (सहावी), जितेंद्र कुमार चौधरी (आठवा), कुणाल जाधव (नववा) क्रमांक मिळवला. इलेक्ट्रॉनिक्स विभागात साक्षी घाटगे प्रथम, यश कवठेकर तृतीय तर सुरज लांडगेने सातवे स्थान मिळवले. मेकॅनिकल विभागात स्वरूप पावशेने नववे, अजिंक्य पाटीलने दहावे स्थान मिळवले. कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनियरिंग विभागाच्या प्राजक्ता जाधवने दहावा क्रमांक मिळवला.

याबाबत बोलताना कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता म्हणाले, विद्यार्थ्यांच्या या कामगिरीमुळे महाविद्यालयाची गुणवत्तापूर्ण परंपरा अधोरेखित झाली. यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. संतोष चेडे, डॉ. के. टी. जाधव, डॉ. सुनील रायकर, संकपाळ यांनी अभिनंदन केले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, गृहराज्यमंत्री सतेज पाटील, आमदार ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, रजिस्ट्रार डॉ. लितेश मालदे, अधिष्ठाता डॉ. क्षमा कुलहल्ली, ट्रेनिंग अँड प्लेसमेंटप्रमुख प्रा. सुदर्शन सुतार यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## सबा लाडला सुवर्णपदक

आर्किटेक्चर विभागाची सबा रियाझ लाड हिने सर्वोच्च गुण मिळवता सुवर्णपदक मिळवले. सबाने १३०० पैकी १२१७ गुण मिळवत ही कामगिरी केली. याच महाविद्यालयाच्या पृथ्वीराज मोरे (द्वितीय), रीतल पंडित (तृतीय), देविका घाटगे (चौथा), रोहन कस्तुरे (सहावा), लांचेबा लिंगथोजम, लकीस्टार पैग्रोपे व महिमा शर्मा (आठवा), स्नेहा पाटील (नववा) व मधुमिता सावंत (दहावा) अशा १० विद्यार्थ्यांनी 'टॉप १०' मध्ये स्थान मिळवले.